सकाळ झाली. सात वाजत आले तरी मनोज अजून झोपलाच होता. आईने हाक मारली "मनू, ए मनू, उठ लवकर. शाळेची तयारी कर. बसची वेळ होईल." मनोजने हो हो केले पण परत झोपला. आई खोलीत आली. दोन चमचे वाजवीत आली. "उठ पटकन. मी कामावर चालले आहे. जेवणाचा डबा घे."

आईने घराचे पुढचे दार बंद करून ती कामावर गेली आणि मनोज खाडकन उठला. दात घासले. आंघोळ केली. कपडे घातले. केसाचा छान भांग पाडला. दुध घेतले. शाळेची पिशवी घेवून बस पकडायला पळाला. घाईत जेवणाचा डबा विसरला.

प्रश्न–

१) किती वाजले होते तरी मनोज झोपूनच राहिला होता?

२) आईने काय केले?

३) आई कुठे चालली होती?

४) मनोज कधी उठला व काय केले?

५) मनोजने शाळेत काय नेले नाही? का?

एक दिवस खूप मोठा पाऊस आला. पावसामधे सगळे भिजले. चिमणी भिजली. कावळा भिजला. मनी मांजर भिजली आणि भू भू मोती पण भिजला. मग सगळे एका झाडाखाली जावून उभे राहिले. आपापले अंग झटकून, चाटून पुसून कोरडे केले. तरी पण थंडी वाजतच होती. वाळलेले गवत, वाळलेली झाडे कुठेच दिसली नाहीत. जिकडे तिकडे पाणीच पाणी. सगळीकडे ओली माती, ओले गवत आणि ओली पाने. गार गार पावसामुळे थंडी वाजतच होती. हळू हळू पाऊस थांबला. पिवळे पिवळे ऊन पडले. थंडी वाजणे कमी झाले.

प्रश्न–

१) या गोष्टीत कोण कोण आहेत?

२) सगळे कशामुळे भिजले?

३) गवत व झाडे कशी झाली होती?

४) थंडी का वाजत होती?

५) पावसात भिजायला नको म्हणून तु काय करतोस/करतेस?

एक होता ससा. पांढरा पांढरा. गोल गोल गुबगुबीत. तुरुतुरु पळायचा. दिवसभर खायचा. एक दिवस सशाला दिसल गाजराचे शेत. गाजर पाहून तोंडाला सुटल पाणी. ससा एकदम शेतात घुसला आणि बकाबका गाजर खायला लागला. पोट भरून खादाडपणा केला. घरी आला. सशाने आईला सांगितले "आई, आई खूप पोट दुखतय" आईने ऑषध आणले. ऑषध नको. सशाला वाटले दूर कुठेतरी पळून जावे. ससा लागला रडायला. आईने ऑषध दिले. दुसरे दिवशी सशाचे पोट दुखणे थांबले. सशाने आईला विचारले "आई, मी गाजर खायला जाऊ?"

प्रश्न–

१) ही गोष्ट कोणाची आहे?

२) ससा कसा दिसतो?

३) सशाचे पोट का दुखले?

४) आईने सशाला काय दिले?

५) पोट दुखते म्हणून सशाने गाजर खाणे बंद केले का?

एकदा ससा आणि कासव यांची पैज लगली. समोर टेकडी आहे तिथे कोण आधी पोहचते पाहू? ससा जोरात पळाला. सशाने माग वळुन पाहिले तर कासव आपल सावकाश हळु हळु चालल होत. सशाला वाटले मीच पैज जिंकणार. मग ससा रमत गमत चालायला लागला. कोवळ गवत दिसले. कासव अजून खूप मागे आहे. असा विचार करून ससा गवत खाऊ लागला. भरपूर पोट भरले. सशाला झाडाखाली झोप लागली. इकडे कासव न थांबता चालतच राहिले. समोर टेकडी दिसते तिथे पोहचायचे हा एकच विचार. काही वेळाने सशाला जाग आली. सशाने इकडे तिकडे पाहिले. मागे पुढे पाहिले. कुठेही कासव दिसेना. अरे हे काय? समोर टेकडीवर कासव आधीच पोहचले होते. कासवाने पैज जिंकली.

प्रश्न–

१) पैज कोणामध्ये लागली होती?

२) सशाला का वाटत होते की तोच जिंकणार?

३) ससा का थांबला?

४) कोण पैज जिंकले व का?

५) समजा कासवा ऐवजी हरीण असते तर कोण जिंकले असते?

एकदा एक माकड झाडावर चढले. माकडाने बघितले तर झाडाला खूप खूप आंबे लागले होते. मोठे मोठे, पिवळे पिवळे. माकडाला आंबा खावासा वाटला. उजवा हात वर केला व फांदीला लागलेला आंबा तोडला. साल सोलून माकड आंबा खाऊ लागला. आंबा मऊ मऊ व गोड गोड होता. माकडाने इकडे तिकडे पाहिले. मी एकटाच हे सगळे आंबे खाणार. किती मजा ! झाडाखाली गाय, बकरी आणि घोडा उभे होते. ते माकडाकडे बघत होते. माकड आंबा खाली टाकेल अशी वाट पहात होते. माकडाने झाडाची फांदी गदागदा हलविली. अनेक आंबे खाली पडले. मग सगळेच जण आंबे खाऊ लागले. मजाच मजा !

प्रश्न–

१) माकडाला काय दिसले?

२) आंबा कडू होता का?

३) झाडाखाली कोण उभे होते?

४) आंबे खाली कसे पडले?

५) पाच गोड फळांची नांवे सांगा.

# उनाड टिपू

एक होता टिपू. तो मोठा उनाड होता. एकदा आईने टिपूला बाजारातून भाजी आणायला सांगितले. टिपूने एक पिशवी घेतली, आणि तुरूतुरू भाजी आणायला गेला. पण उनाड टिपू सरळ बाजारात न जाता इकडे तिकडे वेळ काढत बसला.

कुठे फुलपाखराशी खेळावे, मधेच बेडकासारखी टूणटूण उडी मारीत चालावे, नाहीतर उगीचच खारूताईचा पाठलाग करावा. असे काही ना काही चालू होते.

पुढे एक मैदान लागले. तिथे काही मुले खेळत होती. काही पतंग उडवीत होती. काही लगोरी खेळत होती. तर काही मुले खो-खो खेळत होती. टिपू मुलांत मिसळला आणि खेळू लागला. दिवस मावळला. सगळी मुले घरी हळूहळू घरी गेली. टिपू ही रमत गंमत घरी निघाला. किती वेळ गेला हे टिपूला कळलेच नाही. टिपू घरी गेला, आई दारातच वाट बघत उभी होती. आईने विचारले टिपू कुठे होतास इतका वेळ? आणि भाजी आणलीस का? टिपू भाजी आणायला विसरला होता. आई खूप चिडली आणि टिपूला खूप दम मिळाला.

**प्रश्न-**

1. टिपू कसा मुलगा होता?
2. टिपूला आईने काय सांगितले?
3. टिपूने बाजारात जाताना रस्त्यात काय काय केले?
4. मैदानात मुले काय काय करत होती?
5. टिपूने भाजी का नाही आणली?

---

चांदोबा रुसले
ढगात जाऊन बसले
ढगोबा हसले
चिडकोबा फसले
ढग आहे फाटका
राग आहे लटका
चांदोबा हरले
खुदकन हसले

1. चांदोबा रुसल्यावर कुठे गेला?
2. ढगोबा कुणाला हसले?
3. ढग कसा आहे?
4. चांदोबाला ढगात लपता आले का?
5. चांदोबाचा राग गेला का?

वानरांची सेना
लंकेला गेली
रामाची आणि रावणाची
लढाई झाली
वानरांनी राक्षस
ठोकले फार
रामाने रावणाला
मारले ठार

---

1. वानरांची सेना कुठे गेली?
2. राम आणि रावणात काय झाले?
3. लढाई कुठे झाली?
4. वानरांनी कोणाला मारले?
5. रावणाला कोणी ठार मारले?

बघा बघा माझी बोट
कशी वेगात चालली
आले मुंबई बंदर
तेथे थकून थांबली
मी आणले आंबे टरबूज बोरे
वाट बघती माझी सारे

---

1. बोट कशी जाते?
2. बोट कुठे जात आहे?
3. बोट कुठे थांबली?
4. बोटीतून काय आणले आहे?
5. सगळे बोटीची वाट का बघतात?